क्र.२/नसवि/महासभा/ ०५ /२०१९-२०२०
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०२ मार्च २०२०

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
महानगरपालिका सभा क्रमांक - ०५ /२०१९-२०२०
महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मधील तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक ११/०३/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतराव्दादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचारार्थ आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०१/२०२० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.
२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवट्याचे ठराव, ब) अभिनंदनाचे ठराव.
३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.
४. महानगरपालिका क्षेत्रातील अमरधाम सांगली स्मशान भूमीत नव्याने होणाऱ्या गॅसदाहिनीचे इमारतीस कै.रामभाऊ खाडीलकर असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०३/२०१९ चे विषयपत्र.**
५. महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१३ इस्लामपूर रोड येथील टोल नाका चौकाला कै.प्रकाश मोहिते असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०३/२०१९ चे विषयपत्र.**
६. महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१४ मधील (गणपती पेठेची मागील बाजूस) जत गुडस् ऑफिस समोरील चौकास पै.बाबूमास्तर घोरपडे चौक असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०३/२०१९ चे विषयपत्र.**
७. महानगरपालिका आमराई उद्यानातील कवठ व चिंच झाडांची फळे, आमराई ते कॉलेज कॉर्नर पर्यंतच्या चिंच झाडांची फळे व रि.स.नं.९९/१ सांगली, व सांगली जुने वॉटर वर्क्सचे आवारातील दोन चिंच झाडांची फळे यांचा जिहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.१६/०१/२०२० चे विषयपत्र.**
८. महानगरपालिका मिरज शहरातील रस्त्याकडेला असणाऱ्या चिंच झाडांच्या चिंच फळांचा जिहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.१६/०१/२०२० चे विषयपत्र.**
९. मा.उच्च न्यायालय,मुंबई रिटपिटीशन क्र.३४१२/२०१५ अन्वये बेघरांना वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेमधील घरकुलाचा लाभ देणेस प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ सनियंत्रण समितीने केले शिफारशीनुसार निर्णयार्थ **उपायुक्त (शनादानिक) यांचे दि.०९/०१/२०२० चे विषयपत्र.**
१०. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत इंदिरा घरकुल मिरज दिंडीवेस, मालगाव वेस येथील वंचीत, मयत वारस व वाढीव पात्र लाभार्थी तसेच, संजय गांधी नगर,मिरज येथील वंचित व वाढीव पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणेस निर्णयार्थ **उपायुक्त (शनादानिक) यांचे दि.०९/०१/२०२० चे विषयपत्र.**
११. महानगरपालिका क्षेत्रातील बेडग रोड येथील कचरा डेपो येथे हाडे साठविण्यासाठी मागणी केले अर्जदार यांना प्र.सहा.संचालक नगररचना यांनी कळविलेनुसार सदर जागेचे भाडे मुल्य रु.६५०/- याप्रमाणे तसेच, SWM च्या DPR नुसार जर प्रकल्पास बाधा येत असेल तर जागा बदलणेच्या अटीवर ९ वर्षे मुदतीकरीता दर ३ वर्षांनी २०% भाडे वाढ करणेच्या अटीवर जागा भाड्याने देणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०२/०१/२०२० चे विषयपत्र.**
१२. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.
१३. मा.महापौर, यांचे संमतीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

प्र.महापालिका सचिव,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०५/२०१९-२०२०
महापालिका सभा दिनांक ११/०३/२०२० करीता.

बुधवार दि.११/०३/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर लोकनेते कै.दादासाहेब सिद्राम लांडगे यांचे स्मरण अखंडपणे राहणेसाठी मिरज येथील जवाहर चौक ते न्यायाधिश निवास स्थानकडे जाणारा पूर्व+पश्चिम रस्त्यास माजी उपमहापौर लोकनेते कै.दादासाहेब लांडगे मार्ग असे नामकरण करणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.सविता दादासो मदने यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१९ (ब) मध्ये सांगली मिरज रोड येथील चौकाला संत बाळूमामा चौक असे नामकरण करणेकामी आलेला प्रस्ताव.

३. मा.नसिमा गैबीसो नाईक यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ मधील तक्षीला रोड लगतची सि.स.नं.४२५/०५ जुना १२२/५ पविन या रेखांकनातील तनुहसन पार्क या नावाने नविन कॉलनी झाली असूनसदर कॉलनीस तनुहसन पार्क असे नामकरण करणेकामी आलेला प्रस्ताव.

४. मा.वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली शहरातील वॉर्ड क्र.१० मधील रेल्वे स्टेशन चौक येथे अत्यंत जुनी मुतारी असून, ती मोडकळीस आलेली आहे. सदर मुतारीच्या दुर्गंधीमुळे तेथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी सदरची जुनी धोकादायक मुतारी पाडून त्याच ठिकाणी नविन मुतारी बांधणेकामी निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

५. मा.शिवाजी बाबुराव दुर्वे यांनी दिलेला प्रस्ताव :-

मा.शासनाने कलम ३१(१) अन्वये दि.०४/०४/२०१२ व दि.०३/०३/२०१६ रोजी विकास योजना मंजूर केलेली आहे. त्यामधील दि.०३/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयामधील EPP-६२ मध्ये आरक्षक क्र.३८३ ब च्या दक्षिण बाजूचा काही भाग गार्डन या आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ठ केलेला आहे व उर्वरित भाग हा परत आरक्षण क्र.३८३ ब गार्डन मध्ये कायम ठेवलेले आहे. कपिला हौसिंग सोसायटी स.नं.१९९२ पासून विकसीत झालेली आहे. त्याठिकाणी १००% बांधीव घरे झालेली आहेत. सन २००० साली गुंठेवारी नियमितीकरण करणेकरीता प्रस्ताव १००% दाखल आहेत. सदर ठिकाणी महापालिकेकडून पाणी,रस्ते इत्यादि सुविधा झालेल्या आहेत.कपिला हौसिंग सोसायटी मध्ये आरक्षण क्र.३८३ ब गार्डन हे आरक्षण वगळून रहिवास विभागात समाविष्ठ करावे व गुंठेवारी नियमितीकरण प्रस्ताव मंजुर करुन, तसा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

६. मा.वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव :-

मिरज एम आय डी सी मधील फायरफायटर इमारतीच्या भूखंडावर पूर्व पश्चिम व दक्षिणोत्तर रस्त्याच्या लगतच्या जागेवर बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या बीओटी या तत्वावर गाळे बांधणेकामी निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

७. मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडून दि.१९ मार्च २००५ शासन क्र.एमएजी २००५/९ प्र.क्र.१/आरोग्य ३ मंत्रालय मुंबईचे निर्णयानुसार शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांना महाराष्ट्र शासन (वैद्यकीय देखभाल) नियमाप्रमाणे २७ आजारांवर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील वैद्यकीय खर्चाची वयोगटानुसार वेतनश्रेणी वर्गीकरण न करता औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाचे ९०% रक्कम सरसकट अनुज्ञेय राहील असा महासभा ठराव क्र.३६७ दि.२७/०२/२०१३ अन्वये पारित करणेत आला आहे. या ठरावामध्ये फक्त महानगरपालिकेच्या आस्थापनावरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना लागू करणेत आलेला आहे. परंतु सदर शासकीय कर्मचाऱ्यांची व त्यांच्या कुटूंबियांची आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचारांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या आकस्मिक उदभवणाऱ्या २७ आजारांवर खाजगी रुग्णालयात कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांवर उपचार घेणेसाठी मा.शासन निर्णयानुसार औषधोपचारा वरील खर्चाच्या ९०% रक्कम अदा करणेस निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

८. मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव दाखल करणेची मुदत दि.३१ डिसेंबर २०१९ रोजी संपलेली आहे. शहरातील बहुतांशी नागरिक गुंठेवारी भागातील रहिवाशी असल्यामुळे त्यांना विविध कारणासाठी गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असते.शिवाय गुंठेवारी नियमितीकरणासाठी मुदतवाढ दिल्यास मनपा उत्पनात भर पडणार आहे. यासाठी गुंठेवारी नियमितीकरणासाठी मुदतवाढ देणेबाबत निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

९. मा.सौ.सविता दादासो मदने यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिका वॉर्ड क्र.१९ मधील बेथेलहेमनगर रस्ता क्र.७ विनोबा भावे कॉलनी येथील चौकास नवज्योत चौक असे नामकरण करणेकामी आलेला प्रस्ताव.

... २ ...

१०. मा.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव :-

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाची कमान राजे यशवंतराव होळकर चौक कुपवाड कडे जाणाऱ्या रोडवर बसविणे आवश्यक आहे. या रस्त्यावरील रघुवंश सोसायटी येथील मनपाच्या खुल्या भूखंडावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेले आहे. या स्मारकास निरनिराळ्या ठिकाणाहून समाजबांधव भेट देतात. या स्मारकाचे माहितीसाठी राजे यशवंतराव होळकर चौक, सत्राळकर स्क्वेअर जवळ रस्त्यावर मुख्य चौकात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारक प्रवेशद्वार बांधणेबाबत आलेला प्रस्ताव.

११. मा.युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका कार्यक्षेत्रात माहे जुलै/ऑगस्ट २०१९ मध्ये कृष्णा नदीस आलेल्या महापुरामुळे पाण्याचे पातळीत अत्युच्च वाढ होवून ती ५७.६" इंचापर्यंत गेल्याने सांगली मिरज शहरातील कृष्णाघाट परिसरासह पन्नास टक्क्याहून अधिक नागरी वसाहतींचा भाग पाण्याखाली गेला होता.

सदर पुर ओसरल्यानंतर बऱ्याच नागरी वसाहतीमधील पावसाचे साठलेले पाण्याचा नैसर्गिकरित्या तात्काळ निचरा न झाल्याने नागरीकांचे दळणवळणास तसेच, आरोग्यास अपायकारक परिस्थिती निर्माण झाली असून, नागरीकांच्या प्रचंड रोषास सामोरे जावे लागले आहे. तसेच, पावसाचे पाण्याचा निचरा व्यवस्थित न झाल्याने भुयारी गटारी मध्ये गाळ मिश्रीत पाणी जावून भुयारी पाईप लाईन वारंवार चोप होण्याचे प्रमाण वाढले आहे.

उपरोक्त निर्माण झालेल्या नागरी समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याकामी या क्षेत्रात काम करीत असलेल्या महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागामार्फत प्रकल्प अहवाल तयार करुनघेणे उचित होणार असल्याने व सद्या महानगरपालिकेचे पाणी पुरवठा व भयारी गटार योजना राबविणेकामी सल्लागार म्हणून महाराष्ट्र जिवन प्राधिकरण हे काम करीत असल्याने त्यांची पावसाळी पाण्याच्या निचऱ्यासाकामी (स्टॉर्म वॉटर मॅनेजमेंट) प्रकल्प अहवाल तयार करणेकामी नियुक्ती करणेबाबत चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१२. मा.प्रकाश बाबासो ढंग यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली व मिरज शहरात भुयारी गटार योजना मंजूर होवून कार्यान्वीत झाल्या आहेत. तथापि कुपवाड शहरातील अंडर ग्राऊंड ड्रेनेज योजना कार्यान्वीत झालेली नाही.

तरी कुपवाड अंडरग्राऊंड ड्रेनेज योजनेचा फेर सर्व्हेक्षण करुन प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक आहे. त्याकरीता सद्या महानगरपालिकेच्या सांगली व मिरज येथील भुयारी गटार योजनेसाठी सल्लागार म्हणून काम करीत असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नियुक्ती करणे योग्य होणार असल्याने सल्लागार नियुक्ती होणेसाठी चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१३. मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिकेच्या मिरज आरोग्य विभागाकडे सफाई कर्मचारी प्रशांत परशुराम ढाले हे कामावर कार्यरत असताना दत्त कॉलनी परिसरात मृत्यु पावलेले आहेत. शासन निर्णयानुसार महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा कामावर असताना मृत्यु झाल्यास तातडीने रु.१० लाख आर्थिक मदत देणेचा निर्णय पारित झालेला आहे. त्यास अनुसरुन प्रशांत परशुराम ढाले यांच्या कुटूंबियांना र.रु.१० लाखाची आर्थिक मदत देणेबाबत आलेला प्रस्ताव.

१४. मा.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव :-

मिरज शहराला संगीत कलाकाराची मोठी परंपरा लाभलेली आहे. जसे की पद्मश्री प्रोफेसर बी.आर.देवधर, विनायक बुवा पटवर्धन तसेच, संगीतरत्न अब्दुल करीम खाँ साहेब जे जगविख्यात संगीत कलाकार म्हणून नावारुपाला आले आहेत व त्यांच्या नावामुळे मिरज शहराचे नाव चारही दिशेला पोहचलेले आहे. अशा या महान तिन्हीही कलाकारांची तैलचित्रे महापालिकेच्या बालगंधर्व नाट्यगृहात लावणेबाबत आलेला प्रस्ताव.

१५. मा.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये शालेय पोषण आहार अंतर्गत केंद्रिय किचन प्रणालीची अंमलबजावणी दि.०५ सप्टेंबर २०१९ पासून सुरु करणेत येवून सदरचा ठेका मोठ्या ठेकेदारांना कि ज्यांची वार्षिक उलाढाल ४० लाखापर्यंत आहे अशा ठेकेदारास सदरचा ठेका देणेत आला आहे. परंतु पुर्वी सदरचा पोषण आहाराचा ठेका हा शहरातील विविध छोट्या महिला बचत गटांकडे होता. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रामध्येही पुर्वी प्रमाणे शालेय पोषण आहार हा महिला बचत गटांमार्फतच पुरविला जावा यासाठी तातडीने निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१६. मा.युवराज सतिश बावडेकर आणि मा.अजिंक्य दिनकर पाटील यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिकेकडून नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.स्वमअ-२०१७/प्र.क्र.१२६/नवि-१४ दिनांक ११ जुलै २०१९ अन्वये माहे जुलै २०१९ ते मार्च २०२० अखेर घनकचरा व्यवस्थापनासाठी उपयोगकर्ता शुल्क (कर) ची आकारणी सुरु करणेत आलेली आहे. याबाबत महापालिका क्षेत्रातील नागरीक व व्यवसायीकांकडून तीव्र विरोध केला जात असून, सर्व पक्षीय कृती समितीनेही सदरचा कर रद्द करणेची मागणी केली आहे. त्यानुसार महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५० (अ) नुसार महापालिकेस प्राप्त अधिकाराचा वापर करुन सदरचा कर रद्द करणेबाबत मा.राज्य शासनास विनंती करणे आवश्यक असलेने धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१७. मा.अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव :-

मिरज शहरातील उदगाव वेस,प्राथमिक शाळा क्र.१० पासून शाहीर आण्णाभाऊ साठे पुतळ्याकडे जाणाऱ्या पूर्व-पश्चिम रस्त्याच्या मार्गावर येणाऱ्या मरगुबाई देवालय जवळच्या चौकास श्री.संत शिरोमणी रोहिदास महाराज असे नामकरण करणेकामी आलेला प्रस्ताव.

१८. मा.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड येथील श्री.सुनिल जिनपाल कवठेकर घर ते भूपाल दादा कवठेकर घरापर्यतच्या पुर्व-पश्चिम रस्त्याला स्वातंत्र्य सैनिक स्व.आण्णा नेमाण्णा कोथळे यांचे व कुपवाड येथील श्री.बापू कल्लाप्पा नरदेकर घर ते नागोबा मंदिर पर्यतच्या पुर्व-पश्चिम रस्त्याला स्वातंत्र्य सैनिक स्व.आण्णा परिसा गौडाजे यांचे नाव देणेकामी आलेला प्रस्ताव.

१९. मा.करण किशोर जामवार यांनी दिलेला प्रस्ताव :-

मिरज वॉर्ड क्र.५ चे कार्यक्षेत्रातील हजरत झहानियाँ बाबा दर्ग्याच्या मागील परिसरास हजरत झहानियाँ साहेब मोहल्ला वखारभाग मिरज असे नामकरण करणेकामी आलेला प्रस्ताव.

२०. मा.प्रकाश शामराव मुळके यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.१० मधील रेल्व स्टेशन जवळील जकात नाक्याच्या मागे असणारी महानगरपालिकेची मूतारी ही जुनी व विनावापराची असलेने, सदर ठिकाणी नविन मुतारी बांधणेचे काम सुरु आहे. तरी सदर नविन मुतारी बाधण्यास अडचण होत असल्याने जुनी मुतारी पाडणेकामी आलेला प्रस्ताव.

२१. मा.ॲड.सौ.मोहना वासुदेव ठाणेदार यांनी दिलेला प्रस्ताव :-

प्रभाग क्र.४ मिरज दिंडीवेस,नागराज चौक येथील ना-दुरुस्त असलेले सार्वजनिक शौचालय व मिरज जिलेबी चौक येथील सार्व.मुतारी पाडणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

२२. मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना राज्यातील नगरपालिका/महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे विशिष्ठ स्वरुपाचे काम विचारात घेवून ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे.अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यु झाल्यास अशा सफाई कामगारांच्या पात्र वारसास मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्याबाबत मा.शासन निर्णय क्रमांक सकाक-२०१५/सं.क्र.४२/नवि-३४ दि.१२ जून २०१५ च्या शासन निर्णयानुसार सफाई कामगारांना लाभ देणेकामी आलेला प्रस्ताव.

२३. मा.निरंजन सुरेश आवटी यांनी दिलेला प्रस्ताव :-

मिरज बालगंधर्व नाटयमंदिर विजापूर वेस मिरज ते जिलेबी चौक,मिरज हा रस्ता ४० फुट रुंद ऐवजी प्रस्तावित असलेला ३० फुटी रस्ता करणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

२४. मा.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका मुख्यालय मधील पद्मभूषण वसंतरावदादा पाटील सभागृहाचे नुतनीकरण करणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

२५. मा.अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव :-

मिरज येथील हजरत ख्वॉजा शमना मिरा दर्गा हा प्रसिद्ध देवस्थान असून, सर्व धर्मिय भाविक उरुसानिमित्त भेट देत असतात. यासाठी मिरज हायस्कूलच्या क्रिडांगणावर योग्य ते भाडे भरुन घेवून, दि.२०/०३/२०२० ते ३१/०३/२०२० पर्यत पाळणे लावण्यास परवानगी देणेकामी आलेला प्रस्ताव.

२६. मा.उत्तम बाळकृष्ण साखळकर यांनी दिलेला प्रस्ताव :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र.स्व.म.अ. २०१७/प्र.अ.१२६/न.वि.१४ दि.१९ जुलै २०१९ अन्वये पारित झालेल्या अधिसुचनेनुसार उपयोग कर्ता शुल्क आकारणी बाबत नागरिकांना नोटीसा पाठविणेत येत आहेत. याकरीता घनकचरा अधिनियम २०१६ मध्ये दुरुस्ती करुन, मा.शासनास पाठविणेबाबत आलेला प्रस्ताव.

२७. मा.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका आरोग्य विभाग यांचेकडून दि.२०/०२/२०२० रोजी प्राप्त झालेल्या विषयपत्रास अनुसरुन महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील चौक सुशोभिकरण करणेसाठी सांगली सिव्हील हॉस्पिटल चौक दक्षिणेकडील बाजूस फुटपाथवर सार्वजनिक मुतारी पाडणेस मान्यता देणेस तसेच, सांगली गारपिर चौक येथील जुनी व जीर्ण झालेली मुतारी रस्त्याची उंची वाढल्यामुळे वापरणेस धोकादायक झाली असलेने, सदरची मुतारी पाडणेस व त्याच ठिकाणी नविन मुतारी बांधकाम करणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

२८. मा.शेडजी मोहिते,सौ.कांचन कांबळे,सौ.नसिमा नाईक,मा.जगन्नाथ ठोकळे,मा.महेंद्र सावंत,सौ.अपर्णा कदम, सौ.अप्सरा वायदंडे,कु.सोनाली सागरे यांनी दिलेला प्रस्ताव :-

मा.शासन परिपत्रक क्रमांक सफाई /२००७/१३२/प्र.क्र.३१/०७/नवि-६ दि.१० सप्टेंबर २००७ अन्वये राज्यातील महानगरपालिका,नगरपालिका यांच्याकडील आरोग्य विभागामध्ये बदली सफाई कामगार म्हणून कार्यरत असणाऱ्या बदली सफाई कामगारांना किमान वेतन कायदा (सफाई कामगारांसाठी) १९४८ प्रमाणे व इतर भत्त्यासहीत वेतन देण्यात यावे. तसेच, सफाई बदली कामगार व रोजंदारीवरील कामगारांची वरिष्ठता यादी तयार करुन, तसेच, न्यायालयाच्या आदेशाप्रमाण त्यांना रिक्त जागेवर कायम सेवेत घेणेबाबत आदेशित केले आहे. त्यास मान्यता मिळेतोपर्यत सद्या कार्यरत असणाऱ्या बदली सफाई कर्मचाऱ्यांना महिन्यातील २६ दिवस काम मिळणेबाबत धोरणात्मक निर्णयासाठी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : ०६/०३/२०२०.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज-कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- १८३

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०१/२०२० रोजीचे कार्यवृत्तातील ठराव क्र.१४८ ते ठराव क्र.१८२ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत्तातील ठराव क्र.१४८ मध्ये ठराव क्र.११९ बाबत करणेत आलेली दुरुस्ती व मा.महासभा ठराव क्र.११९ दि.२०/११/२०१९ रोजीचा पारित करणेत आलेला ठराव ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

तसेच, ठराव क्र.१७९ अन्वये मिरज येथील ख्वॉजा शमनामिरा दर्गाह परिसर विकास आराखडा सुधारीत करणेसाठी पुर्वीचे प्रकल्प सल्लागार शरद मोहिते ॲण्ड असोसासिएट्स पुणे यांना मुदतवाढ देणेत आलेली आहे. सदर ठरावामध्ये मुदतवाढ दिलेले सल्लागार यांचेसह प्रकल्प सल्लागार अशफाक अहमद कंन्सलटंन्सी सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड,नागपूर यांची लिडींग मेंबर म्हणून नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे अशी दुरुस्ती करीत असून, उर्वरित कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- मा. आनंदा देवमाने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. युवराज आवडेकर

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- १९१

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१८/०२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील अमरधाम सांगली स्मशान भूमीत नव्याने होणाऱ्या गॅसदाहिनीचे इमारतीस कै.रामभाऊ खाडीलकर असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- १९१

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१८/०२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१३ इस्लामपूर रोड येथील टोल नाका चौकाला कै.प्रकाश मोहिते असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- मा.युवराज बावडेकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- १९३

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१८/०२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१४ मधील (गणपती पेठेची मागील बाजूस) जत गुडस् ऑफिस समोरील चौकास पै.बाबूमास्तर घोरपडे चौक असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या कु.सोनाली विलास सागरे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली मधील त्रिकोणी बाग येथून गल्ली नं.२ आतील बाजूस लालबाग गणेश मंदिर असून, नागरिकांना मंदिर पत्ता लगेच समजनेकरीता त्रिकोणी बाग कॉर्नर येथील चौकास लालबाग कॉर्नर असे नामकरण करणेस स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन, सुचना व हरकती मागविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Y. S. Bamugde
मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने.

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- ११४

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.१६/०१/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका आमराई उद्यानातील कवठ व चिंच झाडांची फळे, आमराई ते कॉलेज कॉर्नर पर्यंतच्या चिंच झाडांची फळे व रि.स.नं.९९/१ सांगली, व सांगली जुने वॉटर वर्क्सचे आवारातील दोन चिंच झाडांची फळे यांचा जिहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदीमधून होणेचा आहे.

सूचक :- मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

महापौर,

उद्यान पर्यवेक्षक

महापालिका सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- १९५

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.१६/०१/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका मिरज शहरातील रस्त्याकडेला असणाऱ्या चिंच झाडांच्या चिंच फळांचा जिहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदीमधून होणेचा आहे.

सूचक :- मा. युवराज बावडेकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने. महापौर,

उपायुक्त परिवेक्षक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- १९६

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (शनादानिक) यांचे दि.०९/०१/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली जिल्हा निवारा संघ व इतर यांनी दाखल केलेल्या रिटपिटीशन क्र.३४१२/२०१५ अन्वये व मे.न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार एकूण प्राप्त ३५७ अर्जापैकी पात्र १३९ लाभार्थ्यांना त्यांचे मागणीनुसार प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ सनियंत्रण समितीने केले शिफारशीनुसार वाल्मिकी आवास योजनेतील रिकाम्या घरकुलाचा लाभ देणेबाबतच्या विषयाबाबतची सविस्तर माहिती प्रशासनाकडून उपलब्ध न झाल्याने, प्रस्तुतचा विषय ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- मा. आनंदा देवमाने

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- मा. युवराज बावडेकर

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- १९७

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (शनादानिक)यांचे दि.०९/०१/२०२० रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.महासभा ठराव क्र.३६ दि.१४/०६/२०१९ अन्वये महापालिका क्षेत्रात केंद्र व राज्य शासनाच्या मार्फत सुरु असलेल्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना, झोपडपट्टी पुर्नवसन व सर्वांसाठी घरे सन २०२२ या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी व त्यावर नियंत्रण ठेवणेसाठी तसेच, झोपडपट्टींचे पुर्नवसन तात्काळ होणेसाठी महापालिकेच्या सनियंत्रण समिती समोर उपरोक्त विषय व त्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या सर्व सूचना मान्यतेस्तव सादर करणेत येवून, सदर समितीच्या शिफारशीने प्रस्तुतचा विषय फेरसादर करणेस आदेशित करणेत आले होते.

त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजना सनियंत्रण समितीने शिफारस केलेनुसार एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजनेंतर्गत टप्पा क्र.०२ इंदिरानगर घरकुल दिंडीवेस, मालगाव वेस,मिरज संजय गांधी नगर, मिरज येथील वाढीव लाभार्थ्यांकडून र.रु.४००००/- व मयत वारस लाभार्थ्यांकडून र.रु.५०००/- वंचीत लाभार्थ्यांसाठी मा.शासन निर्णयाप्रमाणे मागासवर्गीय लाभार्थ्यांना र.रु.१२,५००/- व खुला प्रवर्ग लाभार्थ्यांना र.रु.१५,०००/- भरुन घेवून पात्र लाभार्थ्यांना लाभ देणेबाबतच्या विषयाबाबतची सविस्तर माहिती प्रशासनाकडून उपलब्ध न झाल्याने, प्रस्तुतचा विषय ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- मा. आनंदा देवमाने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. युवराज कावडेकर

महापौर,

महानगरपालिका सचिव
महानगरपालिका, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

इंदिरा नगर येथील वाढीव पात्र लाभार्थी (१६१ +११ = १७२) - १७२

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- ११८

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०२/०१/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील बेडग रोड येथील कचरा डेपो येथे हाडे साठविण्यासाठी मागणी केले अर्जदार यांना प्र.सहा.संचालक नगररचना यांनी कळविलेनुसार सदर जागा १०१.२ चौ.मी. या रिकाम्या जागेचे भाडे मुल्य प्रति महिना रु.६५०/- याप्रमाणे तसेच, SWM च्या DPR नुसार जर प्रकल्पास बाधा येत असेल तर जागा बदलणेच्या अटीवर ९ वर्षे मुदतीकरीता दर ३ वर्षानी २०% भाडे वाढ करणेच्या अटीवर जागा भाड्याने देणेबाबतच्या विषयाच्या अनुषंगाने सभागृहाच्या भावना विचारात घेवून, प्रस्तुतचा विषय ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.शासना परिपत्रकान्वये मालमत्ता विभागाकडून देण्यात येणाऱ्या जागांपैकी ५% जागा दिव्यांगासाठी आरक्षीत करुन वितरीत करण्यात याव्यात असे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेकडे जागा मागणी केलेले दिव्यांग श्री.दशरथ दादू दुधाळ रा.सांगली यांना माधवनगर रोड वरील महानगरपालिकेचा जुना जकात नाक्याची स.नं.१७० A मधील बांधीव इमारत सदर इमारतीची सहा.संचालक नगररचना यांचेकडून भाडे निश्चित करुन घेवून, ९ वर्षे मुदतीकरीता दर ३ वर्षांनी २०% भाडेवाढ करणेच्या अटीवर भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य सौ.अप्सरा महेंद्र वायदंडे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.शासना परिपत्रकान्वये मालमत्ता विभागाकडून देण्यात येणाऱ्या जागांपैकी ५% जागा दिव्यांगासाठी आरक्षीत करुन वितरीत करण्यात याव्यात असे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेकडे जागा मागणी केलेले दिव्यांग श्री.मोतीराम विठोबा भाट रा.लक्ष्मी नारायण कॉलनी डी मार्ट मागे यांना सांगली कोल्हापूर रोड वरील महानगरपालिकेचा जुना जकात नाक्याचा स.नं.५११ मधील पत्राशेड व मागील १५X२० रिकामी जागा सहा.संचालक नगररचना यांचेकडून भाडे निश्चित करुन घेवून, ९ वर्षे मुदतीकरीता दर ३ वर्षांनी २०% भाडेवाढ करणेच्या अटीवर भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.गजानन रामु मगदुम यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड सि.स.नं.२४९९ मधील जागा तत्कालीन कुपवाड ग्रामपंचायतीने श्री.परसराम विठोबा हंकारे यांना ३०X६० फुट जागा भाडे पट्टयाने दिलेली होती. मे.जॉ.सिव्हील जज्य ज्यु.डी.सांगली दिवानी दावा नं.२९६/१९८४ दि.१९/०७/१९८६ चे आदेशानुसार श्री.हंकारे यांचे ताब्यात देणेचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार श्री.हंकारे महापालिकेकडे भाडे भरत आहेत.परंतु, महानगरपालिकेने अद्याप त्यांचेबरोबर लेखी करारपत्र केलेले नाही. सद्या सदरच्या जागेमध्ये श्री.रावसाहेब परशराम हंकारे व श्री.योगेश बबन हिंगमिरे हे व्यवसाय करीत असून, त्यांनी सदरच्या जागेपैकी २४X१३ चौ.फुट प्रत्येकी इतकी जागा रितसर चालू बाजारभावाने भाडे पट्टयाने मागणी केलेनुसार सदर जागेचे सहा.संचालक नगररचना यांचेकडून भाडे निश्चित करुन घेवून, ९ वर्षे मुदतीकरीता दर ३ वर्षांनी २०% भाडेवाढ करणेच्या अटीवर भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सा. आनंदा देवमाने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सा. युवराज बावडेकर

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- १९९

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (दिव्यांग कक्ष) यांचे दि.१७/०२/२०२० चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

केंद्र शासनाने अपंग व्यक्ती कायदा समान संधी,हक्क संरक्षण व पूर्ण सहभाग अधिनियम १९९५ दि.०१/०१/१९९६ पासून लागू केला असून, सदर कायद्यातील कलम ४० अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगासाठी किमान ५% निधी राखीव ठेवणेबाबत शासन निर्णय क्र.संकिर्ण - २०१५/प्र.क्र.११८/नवि-२० मंत्रालय मुंबई यांचे दि.२८/१०/२०१५ अन्वये दिले निर्देशानुसार सदर ५% निधी नागरी भागातील अपंगाच्या कल्याणकरीता वापरण्याबाबत मार्गदर्शक सूचनानुसार सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग २२२५ व्यक्तींची नोंदणी दिव्यांग कक्षाकडे झालेली आहे. तसेच, महापालिका क्षेत्रातील २०२ कुष्ठरोग व्यक्ती असे एकूण २४२७ दिव्यांग लाभार्थी व्यक्तींना प्रति दिव्यांग व्यक्ती प्रतिमहा रु.६००/- याप्रमाणे वार्षिक र.रु.१,७४,७४,४००/- मात्र उदरनिर्वाह भत्ता आदा करणेस व दिव्यांग कक्षाकरीता कार्यालयीन खर्च व इतर अनुषंगिक खर्चाकरीता रु.५०,०००/- पर्यंतच्या खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- Y. S. Bankrajan
मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. धीरज सुर्यवंशी

महापौर,

दिव्यांगकक्ष प्रमुख

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २००

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये खालील सदस्यांनी दिलेले तपशिलात नमुद नामकरणाचे प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार खालील तपशिलात नमुद केले नामकरण प्रस्तावावर जाहिर सूचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

अ. क्र.	प्रस्ताव देणाऱ्या सदस्यांचे नाव	तपशिल
१.	मा.अतहर इद्रिस नायकवडी	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर लोकनेते कै.दादासाहेब सिद्राम लांडगे यांचे स्मरण अखंडपणे राहणेसाठी मिरज येथील जवाहर चौक ते न्यायाधिश निवास स्थानकडे जाणारा पूर्व+पश्चिम रस्त्यास माजी उपमहापौर लोकनेते कै.दादासाहेब लांडगे मार्ग असे नामकरण करणे
२.	मा.नसिमा गैबीसो नाईक	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ मधील तक्षीला रोड लगतची सि.स.नं.४२५/०५ जुना १२२/५ पविन या रेखांकनातील तनुहसन पार्क या नावाने नविन कॉलनी झाली असून सदर कॉलनीस तनुहसन पार्क असे नामकरण करणे
३.	मा.सौ.सविता दादासो मदने	महापालिका वॉर्ड क्र.११ मधील बेथेलहेमनगर रस्ता क्र.७ विनोबा भावे कॉलनी येथील चौकास नवज्योत चौक असे नामकरण करणे
४.	मा.अतहर इद्रिस नायकवडी	मिरज शहरातील उदगाव वेस,प्राथमिक शाळा क्र.१० पासून शाहीर आण्णाभाऊ साठे पुतळ्याकडे जाणाऱ्या पूर्व-पश्चिम रस्त्याच्या मार्गावर येणाऱ्या मरगुबाई देवालय जवळच्या चौकास श्री.संत शिरोमणी रोहिदास महाराज असे नामकरण करणे.
५.	मा.शेडजी सुबराव मोहिते	महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड येथील श्री.सुनिल जिनपाल कवठेकर घर ते भूपाल दादा कवठेकर घरापर्यंतच्या पुर्व-पश्चिम रस्त्याला स्वातंत्र्य सैनिक स्व.आण्णा नेमाण्णा कोथळे यांचे व कुपवाड येथील श्री.बापू कल्लाप्पा नरदेकर घर ते नागोबा मंदिर पर्यंतच्या पुर्व-पश्चिम रस्त्याला स्वातंत्र्य सैनिक स्व.आण्णा परिसा गौडाजे यांचे नाव देणे
६.	मा.करण किशोर जामदार	मिरज वॉर्ड क्र.५ चे कार्यक्षेत्रातील हजरत झहानियाँ बाबा दर्ग्याच्या मागील परिसरास हजरत झहानियाँ साहेब मोहल्ला बखारभाग मिरज असे नामकरण करणे

सूचक :- य. स जाधव
मा. युवराज बावडेकर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २०१

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सविता दादासो मदने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१९ (ब) मध्ये सांगली मिरज रोड येथील चौकाला संत बाळूमामा चौक असे नामकरण करणेकामी आलेला प्रस्तावावर .उपस्थित सदस्यांनी लेखी विरोध दर्शविल्याने, प्रस्तुतचा प्रस्ताव ही सभा नामंजुर करीत आहे.

सूचक :- Y. S Bawadekar
मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २०२

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली शहरातील वॉर्ड क्र.१० मधील रेल्वे स्टेशन चौक येथे अत्यंत जुनी मुतारी असून, ती मोडकळीस आलेली आहे. सदर मुतारीच्या दुर्गंधीमुळे तेथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी सदरची जुनी धोकादायक मुतारी पाडून त्याच ठिकाणी नविन मुतारी बांधकाम करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सन्मा. सुकाज बाबर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सन्मा. आनंदा देवमाने. महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २०३

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य शिवाजी बाबूराव दुर्वे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.शासनाने कलम ३१(१) अन्वये दि.०४/०४/२०१२ व दि.०३/०३/२०१६ रोजी विकास योजना मंजूर केलेली आहे. त्यामधील दि.०३/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयामधील EPP-६२ मध्ये आरक्षण क्र.३८३ ब च्या दक्षिण बाजूचा काही भाग गार्डन या आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ठ केलेला आहे व उर्वरित भाग हा परत आरक्षण क्र.३८३ ब गार्डन मध्ये कायम ठेवलेले आहे. कपिला हौसिंग सोसायटी स.नं.१९१२ पासून विकसीत झालेली आहे. त्याठिकाणी १००% बांधीव घरे झालेली आहेत. सन २००० साली गुंठेवारी नियमितीकरण करणेकरीता प्रस्ताव १००% दाखल आहेत. सदर ठिकाणी महापालिकेकडून पाणी,रस्ते इत्यादि सुविधा झालेल्या आहेत.कपिला हौसिंग सोसायटी मध्ये आरक्षण क्र.३८३ ब गार्डन हे आरक्षण वगळून रहिवास विभागात समाविष्ठ करावे व गुंठेवारी नियमितीकरण प्रस्ताव मंजुर करुन, तसा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.१४८ दि.२०/०१/२०२० अन्वये महापालिकेने काही सूचना हरकतींचा समावेश करुन EESL च्या प्रस्तावाला मान्यता द्यावी असे निर्देशित केले होते. त्या सुचना हरकतीबाबत दि.२८/०१/२०२० व दि.१७/०२/२०२० रोजी काही अटी शिथील करण्याबाबत तसेच काही अटीबाबत सविस्तर खुलासा करण्याबाबत दिलेल्या पत्रानुसार EESL चे उत्तर प्राप्त आहे. या उत्तरानुसार अतिरिक्त भौतिक सुविधांसाठी करावा लागणारा मोठा खर्च,नैसर्गिक आपत्ती वा अन्य परिस्थितीत EESL स्विकारत नसलेली जबाबदारी, स्मार्ट LED या तंत्रज्ञानाचा वापर करताना महापालिकेवर पडणारा आर्थिक अतिरिक्त भार या बाबी पाहता तसेच, शासनाने EESL शी करारनाम्याची घालून दिलेली मुदत संपलेली आहे हे लक्षात घेता व खाजगी खुल्या स्पर्धेतून EESL पेक्षा चांगली अंमलबजावणी व नविन तंत्रज्ञान (SMART LED) वापरताना तेव्हडाच खर्च होण्याची शक्यता पहाता या प्रकल्पाबाबत एक वेळ खाजगी खुली स्पर्धा ई-निविदेद्वारे करावी असे या सभेचे मत असून, त्यानुसार प्रकल्पाबाबत ई-निविदा करणेबाबत प्रशासनाने मा.शासनास विनंती करणेस ही सभा आदेशित करीत असून, खाजगी खुल्या स्पर्धेतून स्पर्धात्मक कमी दरात EESL पेक्षा उत्तम दर्जाची सुविधा मिळल्यास, पात्र संस्थेची निवड करावी तसेच EESL पेक्षा अधिक दर प्राप्त झाल्यास EESL कडून प्रकल्पाची अंमलबजावणी करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- मा.आनंदा देवमाने

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २०४

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज एम आय डी सी मधील फायरफायटर इमारतीच्या भूखंडावर पूर्व पश्चिम व दक्षिणोत्तर रस्त्याच्या लगतच्या जागेवर बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या बीओटी या तत्वावर गाळे बांधणेकामी निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर सभेमध्ये झाले चर्चेनुसार बीओटी करणेस सदस्यांचा विरोध विचारात घेवून, सदरचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :- सा. भुपराज आवडेकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सा. आनंदा देवमाने. महापौर,

सहा.आयुक्त

महापालिका मंडळ

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २०५

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडून दि.१९ मार्च २००५ शासन क्र.एमएजी २००५/९ प्र.क्र.१/आरोग्य ३ मंत्रालय मुंबईचे निर्णयानुसार शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांना महाराष्ट्र शासन (वैद्यकीय देखभाल) नियमाप्रमाणे २७ आजारांवर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील वैद्यकीय खर्चाची वयोगटानुसार वेतनश्रेणी वर्गीकरण न करता औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाचे ९०% रक्कम सरसकट अनुज्ञेय राहील असा महासभा ठराव क्र.३६७ दि.२७/०२/२०१३ अन्वये पारित करणेत आला आहे. या ठरावामध्ये फक्त महानगरपालिकेच्या आस्थापनावरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना लागू करणेत आलेला आहे. परंतु सदर शासकीय कर्मचाऱ्यांची व त्यांच्या कुटूंबियांची आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचारांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या आकस्मिक उदभवणाऱ्या २७ आजारांवर खाजगी रुग्णालयात कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांवर उपचार घेणेसाठी मा.शासन निर्णयानुसार औषधोपचारा वरील खर्चाच्या ९०% रक्कम अदा करणेस निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Y. S Bannawar
मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

महापौर,

प्रशासन अधिकारी (अ.क्र.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २०६

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव दाखल करणेची मुदत दि.३१ डिसेंबर २०१९ रोजी संपलेली आहे. शहरातील बहूतांशी नागरिक गुंठेवारी भागातील रहिवाशी असल्यामुळे त्यांना विविध कारणासाठी गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असते.शिवाय गुंठेवारी नियमितीकरणासाठी मुदतवाढ दिल्यास मनपा उत्पनात भर पडणार आहे. यासाठी गुंठेवारी नियमितीकरणासाठी माहे डिसेंबर २०२० अखेर मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- U. S Bamane
मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने.

महापौर;

स.स.नं.२

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २०७

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाची कमान राजे यशवंतराव होळकर चौक कुपवाड कडे जाणाऱ्या रोडवर बसविणे आवश्यक आहे. या रस्त्यावरील रघुवंश सोसायटी येथील मनपाच्या खुल्या भूखंडावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेले आहे. या स्मारकास निरनिराळ्या ठिकाणाहून समाजबांधव भेट देतात. या स्मारकाचे माहितीसाठी राजे यशवंतराव होळकर चौक, सत्राळकर स्क्वेअर जवळ रस्त्यावर मुख्य चौकात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारक प्रवेशद्वार बांधणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य सौ.नसिमा गैबीसो नाईक यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली दक्षिण शिवाजी नगर येथील जवाहर चौक शैलेजा अपार्टमेंट न्यु.देवचंद्र मेडिकल नजीक व साईनाथ कॉम्प्लेक्स मधील रस्त्याचे प्रवेशद्वारास स्वागत कमान बांधकाम करणेस व त्यावर लालबाग गणेश मंदिर प्रवेशद्वार असे नामकरण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सा. युवराज कांबेकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सा. आनंदा देवमाने महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २०८

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात माहे जुलै/ऑगस्ट २०१९ मध्ये कृष्णा नदीस आलेल्या महापुरामुळे पाण्याचे पातळीत अत्युच्च वाढ होवून ती ५७.६" इंचापर्यत गेल्याने सांगली मिरज शहरातील कृष्णाघाट परिसरासह पन्नास टक्क्याहून अधिक नागरी वसाहतींचा भाग पाण्याखाली गेला होता.

सदर पुर ओसरल्यानंतर बऱ्याच नागरी वसाहतीमधील पावसाचे साठलेले पाण्याचा नैसर्गिकरित्या तात्काळ निचरा न झाल्याने नागरीकांचे दळणवळणास तसेच, आरोग्यास अपायकारक परिस्थिती निर्माण झाली असून, नागरीकांच्या प्रचंड रोषास सामोरे जावे लागले आहे. तसेच, पावसाचे पाण्याचा निचरा व्यवस्थित न झाल्याने भुयारी गटारी मध्ये गाळ मिश्रीत पाणी जावून भुयारी पाईप लाईन वारंवार चोकअप होण्याचे प्रमाण वाढले आहे.

उपरोक्त निर्माण झालेल्या नागरी समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याकामी या क्षेत्रात काम करीत असलेल्या महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागामार्फत प्रकल्प अहवाल तयार करुनघेणे उचित होणार असल्याने व सद्या महानगरपालिकेचे पाणी पुरवठा व भुयारी गटार योजना राबविणेकामी सल्लागार म्हणून महाराष्ट्र जिवन प्राधिकरण हे काम करीत असल्याने, पावसाळी पाण्याच्या निचऱ्यासाकामी (स्टॉर्म वॉटर मॅनेजमेंट) प्रकल्प अहवाल तयार करणेकामी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सौ. आनंदा देवमाने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- युवराज बावडेकर

महापौर;

सहायक आयुक्त

महापालिका सचिव;
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २०९

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य प्रकाश बाबासो ढंग यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली व मिरज शहरात भुयारी गटार योजना मंजूर होवून कार्यान्वीत झाल्या आहेत. तथापि कुपवाड शहरातील अंडर ग्राऊंड ड्रेनेज योजना कार्यान्वीत झालेली नाही.

तरी कुपवाड अंडरग्राऊंड ड्रेनेज योजनेचा फेर सर्व्हेक्षण करुन प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक आहे. त्याकरीता सद्या महानगरपालिकेच्या सांगली व मिरज येथील भुयारी गटार योजनेसाठी सल्लागार म्हणून काम करीत असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची प्रकल्प अहवला तयार करणेसाठी नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Y. S Bawadi
मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

महापौर,

कार्य. अभियंता (जल वि. धारण)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २१०

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या मिरज आरोग्य विभागाकडे सफाई कर्मचारी प्रशांत परशुराम ढाले हे कामावर कार्यरत असताना दत्त कॉलनी परिसरात मृत्यु पावलेले आहेत. शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्यांचा कामावर असताना मृत्यु झाल्यास तातडीने रु.१० लाख आर्थिक मदत देणेचा निर्णय पारित झालेला आहे. त्यास अनुसरुन प्रशांत परशुराम ढाले यांच्या कुटूंबियांना र.रु.१० लाखाची आर्थिक मदत देणेबाबत आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Y. S Bawaiwar
मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

महापौर,

प्रशासन अधिकारी (आस्था)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २११

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज शहराला संगीत कलाकाराची मोठी परंपरा लाभलेली आहे. जसे की पद्मश्री प्रोफेसर बी.आर.देवधर, विनायक बुवा पटवर्धन तसेच, संगीतरत्न अब्दुल करीम खाँ साहेब जे जगविख्यात संगीत कलाकार म्हणून नावारुपाला आले आहेत व त्यांच्या नावामुळे मिरज शहराचे नाव चारही दिशेला पोहचलेले आहे. अशा या महान तिन्हीही कलाकारांची तैलचित्रे महापालिकेच्या बालगंधर्व नाट्यगृहात लावणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. आनंदा देवमाने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. युवराज कावडेकर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २१२

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये शालेय पोषण आहार अंतर्गत केंद्रिय किचन प्रणालीची अंमलबजावणी दि.०५ सप्टेंबर २०१९ पासून सुरु करणेत येवून सदरचा ठेका मोठ्या ठेकेदारांना कि ज्यांची वार्षिक उलाढाल ४० लाखापर्यंत आहे अशा ठेकेदारास सदरचा ठेका देणेत आला आहे. परंतु पुर्वी सदरचा पोषण आहाराचा ठेका हा शहरातील विविध छोट्या महिला बचत गटांकडे होता. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रामध्येही पुर्वी प्रमाणे शालेय पोषण आहार हा महिला बचत गटांमार्फतच पुरविला जावा यासाठी तातडीने निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावावर झाले चर्चेनुसार सदरचा निर्णय मा.शासनाचा असलेने, सदर निर्णयाचा फेरविचार करणेबाबत प्रशासनाने मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

महापौर,

प्रभारी अधिकारी (प्रा.हो.म.)

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २१३

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य युवराज सतिश बावडेकर, मा.अजिंक्य दिनकर पाटील आणि मा.श्री.उत्तम बाळकृष्ण साखळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेकडून नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.स्वमअ-२०१७/प्र.क्र.१२६/नवि-१४ दिनांक ११ जुलै २०१९ अन्वये माहे जुलै २०१९ ते मार्च २०२० अखेर घनकचरा व्यवस्थापनासाठी उपयोगकर्ता शुल्क (कर) ची आकारणी सुरु करणेत आलेली आहे. याबाबत महापालिका क्षेत्रातील नागरीक व व्यवसायीकांकडून तीव्र विरोध केला जात असून, सर्व पक्षीय कृती समितीनेही सदरचा कर रद्द करणेची मागणी केली आहे. त्यानुसार महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५० (अ) नुसार महापालिकेस प्राप्त अधिकाराचा वापर करुन सदरचा कर रद्द करणेबाबत मा.राज्य शासनास विनंती करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये नुकताच महापुर आलेला होता. सदर महापुरामध्ये महापालिका क्षेत्रातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच, आर्थिक मंदी व महापुरामुळे व्यावसायिकांचेही मोठी वित्तीय हानी झालेली आहे. महापालिका ही ड वर्गातील असून, महापुरामुळे महापालिकेचा घरपट्टी व पाणी पट्टीचा वसुल झालेला नाही. तसेच, महापालिका घरपट्टीमधून स्वच्छता कर आकारणी करीत असल्यामुळे हा नविन स्वच्छता उपभोक्ता कर भरणेस नागरिकांचा विरोध आहे. राज्यातील इतर काही महानगरपालिकेमध्ये रु.५०००/- पेक्षा जास्त घरपट्टी असणा-यांना हा कर लागू केलेला आहे. तथापि, आपल्या महापालिकेने सदरचा कर सरसकट सर्वांना लागू केलेला आहे. त्यामुळे गोरगरिब,झोपडपट्टीधारक व मध्यमवर्गीयांना हा कर भरणे जाचक होणार आहे असे या सभेचे मत आहे.

तसेच घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अंतर्गत महापालिकेने कचरा गोळा करणे व त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणेची प्रक्रिया सुरु केलेनंतरच हा कर लागू करणे आवश्यक असताना महापालिकेने शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लागणेची प्रकिया सुरु करणे पूर्वीच हा कर लावला असल्याने तो नागरिकांचेवर अन्यायकारक आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा व सन २०१९ मध्ये आलेला महापुर व आर्थिक मंदी याचा विचार करुन, महापालिकेने मा.शासन आदेशानुसार माहे जुलै २०१९ ते मार्च २०२० अखेर घनकचरा व्यवस्थापनासाठी उपयोग कर्ता शुल्क (करची) केलेली आकारणी रद्द करुन, सदर कर वसुल करणेस महापालिकेस दोन वर्षासाठी सुट मिळणेबाबत प्रशासनाने मा.शासनाकडे पाठपुरावा करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. आनंदा देवमाने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. युवराज बावडेकर

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २१४

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य प्रकाश शामराव मुळके यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.१० मधील रेल्व स्टेशन जवळील जकात नाक्याच्या मागे असणारी महानगरपालिकेची मूतारी ही जुनी व विनावापराची असलेने, सदर ठिकाणी नविन मुतारी बांधणेचे काम सुरु आहे. तरी सदर नविन मुतारी बाधण्यास अडचण होत असल्याने जुनी मुतारी पाडणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सा. युवराज बावडेकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सा. आनंदा देवमाने महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २१५

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य ॲड.सौ.मोहना वासुदेव ठाणेदार यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

प्रभाग क्र.४ मिरज दिंडीवेस,नागराज चौक येथील ना-दुरुस्त असलेले सार्वजनिक शौचालय व मिरज जिलेबी चौक येथील सार्व.मुतारी पाडणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- Y. S Jamdade
मा.युवराज जावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

महापौर,

सहआयुक्त

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २१६

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना राज्यातील नगरपालिका/ महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे विशिष्ठ स्वरुपाचे काम विचारात घेवून ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे.अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यु झाल्यास अशा सफाई कामगारांच्या पात्र वारसास मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्याबाबत मा.शासन निर्णय क्र.सकाक-२०१५/सं.क्र.४२/नवि-३४ दि.१२ जून २०१५ च्या शासन निर्णयानुसार सफाई कामगारांना लाभ देणेकामी आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Y. S [signature] ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature] महापौर,

१) प्रशासन अधिकारी (आस्था)
२) मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २१७

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य निरंजन सुरेश आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज बालगंधर्व नाटयमंदिर विजापूर वेस मिरज ते जिलेबी चौक,मिरज हा रस्ता ४० फुट रुंद ऐवजी प्रस्तावित असलेला ३० फुटी रस्ता करणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्तावावर सभागृहात झाले चर्चेनुसार प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

महापौर,..

स.स.न.र.

महानगरपालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २१८

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका मुख्यालय मधील पद्मभूषण वसंतरावदादा पाटील सभागृहामधील बैठक व्यवस्था मधील खुर्च्या खराब झालेल्या आहेत. तसेच, सभागृहामध्ये मा.महापौर यांची बैठक व्यवस्था असलेले डायसची साईज वाढविणे आवश्यक आहे. प्रत्येक सदस्य यांचे टेबलबर माईक सिस्टीम नसलेने सभेमध्ये बोलताना सदस्यांची गैरसोय होत आहे. तसेच, सभागृहामध्ये वातानुकूलीत यंत्रणा नसलेने ती बसविणे, तसेच, वॉशरुमची सोय नसलेने ती व्यवस्था होणेसाठी सदस्यांची मागणी आहे. त्यानुसार सभागृहाचे नुतनीकरण करणेच्या आवश्यक अनुषंगिक कामगिऱ्या प्रशासनाने तातडीने कराव्यात असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा.युवराज बावडेकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने महापौर,

सहाय्यक अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २१९

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज येथील हजरत ख्वॉजा शमना मिरा दर्गा हा प्रसिद्ध देवस्थान असून, सर्व धर्मिय भाविक उरुसानिमित्त भेट देत असतात. यासाठी मिरज हायस्कूलच्या क्रिडांगणावर योग्य ते भाडे भरुन घेवून, दि.२०/०३/२०२० ते ३१/०३/२०२० पर्यत पाळणे लावण्यास परवानगी देणेकामी आलेला प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :- मा. युवराज बावडेकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने. सहीपोर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २२०

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका आरोग्य विभाग यांचेकडून दि.२०/०२/२०२० रोजी प्राप्त झालेल्या विषयपत्रास अनुसरुन महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील चौक सुशोभिकरण करणेसाठी सांगली सिव्हील हॉस्पिटल चौक दक्षिणेकडील बाजूस फुटपाथवर सार्वजनिक मुतारी पाडणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच, सांगली गारपिर चौक येथील जुनी व जीर्ण झालेली मुतारी रस्त्याची उंची वाढल्यामुळे वापरणेस धोकादायक झाली असलेने, सदरची मुतारी पाडणेस व त्याच ठिकाणी नविन मुतारी बांधकाम करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. आनंदा देवमाने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. युवराज बावडेकर

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

वि. २५/०२/२० च्या

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ११/०३/२०२०

ठराव क्रमांक :- २२१

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य शेडजी मोहिते,सौ.कांचन कांबळे,सौ.नसिमा नाईक,मा.जगन्नाथ ठोकळे,मा.महेंद्र सावंत,सौ.अपर्णा कदम, सौ.अप्सरा वायदंडे,कु.सोनाली सागरे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.शासन परिपत्रक क्रमांक सफाई /२००७/१३२/प्र.क्र.३१/०७/नवि-६ दि.१० सप्टेंबर २००७ अन्वये राज्यातील महानगरपालिका,नगरपालिका यांच्याकडील आरोग्य विभागामध्ये बदली सफाई कामगार म्हणून कार्यरत असणाऱ्या बदली सफाई कामगारांना किमान वेतन कायदा (सफाई कामगारांसाठी) १९४८ प्रमाणे व इतर भत्त्यासहीत वेतन देण्यात यावे. तसेच, सफाई बदली कामगार व रोजंदारीवरील कामगारांची वरिष्ठता यादी तयार करुन, तसेच, न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्यांना रिक्त जागेवर कायम सेवेत घेणेबाबत आदेशित केले आहे. त्यास मान्यता मिळेतोपर्यत सद्या कार्यरत असणाऱ्या बदली सफाई कर्मचाऱ्यांना महिन्यातील २६ दिवस काम मिळणेबाबत धोरणात्मक निर्णयासाठी आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेकडील बदली कर्मचारी यांना प्रशासनाने किमान वेतन कायद्यानुसार वेतन आदा करावे. तसेच, बदली कर्मचारी यांची जेष्ठता यादी तयार करुन, ती महापालिकेच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करुन सूचना हरकती मागवून, जेष्ठता यादी अंतिम करावी. अंतिम जेष्ठता यादीनुसार पात्र बदली कर्मचाऱ्यांना रिक्त जागी कायम सेवेत घेणेबाबत मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करावा. तसेच, बदली सफाई कर्मचाऱ्यांना महिन्यातील २६ दिवस काम मिळावे या मागणीसाठीचा अहवाल प्रशासनाने सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. युवराज कावडेकर — ठराव सर्वानुमते मंजुर

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

सहापारे, .